IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 Online ISSN 2278-8808
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SRJIS
www.srjis.com

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE,2021, VOL - 10, ISSUE-47

Indian Social & Research Foundation Akola ,

## ARTS COLLEGE MALKAPUR, AKOLA

( Accredited By NAAC With "B" Grade)
Department of Music & IQAC Organizing

In Collaboration with
**Sharda Sangeet - Kala Academy Indore (M.P.)**

**One Day National E- Conference**

# Contribution of Modern Technology in Globalization & Development of Music & All Interdisciplinary Subjects

**Editor-In-Chief**
**Asso. Prof. Dr. Yashpal D. Netragaonkar**
*MIT World Peace University School of Education, Kothrud, Pune*

**Editor**
**Dr. Gitali S. Pande**
*Principal , Head of Music Department, Arts College Malkapur, Akola (M.S.)*

**Co- Editor**
**Dr. Sunil B. Patake**
*Department of Music Arts College Malkapur, Akola (M.S.)*

**SCHOLARLY RESEARCH JOURNALS**
*S. No. 5+4/5+4, TCG'S, Saidatta Niwas, D-wing, Ph- II, 2nd Floor, F. No. 104, Nr. Telco Colony & Blue Spring Society, Dattanagar, Jambhulwadi Road, Ambegaon (BK), Pune - 411046. Website: www.srjis.com*

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| 12. आधुनिक तंत्रज्ञान व शास्त्रीय संगीत...<br>*प्रा. डॉ. राहुल काशिनाथराव एकबोटे* | 546-548 |
| 13. जागतिकीकरण आणि संगीताच्या विकासात आधुनिक तंत्रज्ञानाचे योगदान<br>*ज्ञानेश्वर बोंपीलवार* | 549-552 |
| 14. संगीताचे जागतिकीकरण व विकास यामध्ये आधुनिक तंत्रशास्त्राचे योगदान<br>*डॉ. रश्मि शैलेश देशपांडे* | 553-558 |
| 15. संगीताच्या विकासात आधुनिक तंत्रज्ञानाचे योगदान<br>*प्रा. चंद्रशेखर हि. मेंडोले* | 559-562 |
| 16. विदर्भातील दलितरत्न : श्री. किसन फागुजी बन्सोड<br>*प्रा. डॉ. अरुण एन. फरपट* | 563-568 |
| 17. सांगीतीक वाद्य व मानवी जिवन<br>*प्रा. संतोष मुकिंदा धंदरे* | 569-572 |
| 18. वाचनसंस्कृती वाढीसाठी ग्रंथालयातील उपक्रम आणि योगदान<br>*प्रा. मंगेश वामनराव वागदे* | 573-577 |
| 19. आधुनिक तंत्रज्ञाना अंतर्गत समाजाचा विकास - एक आढावा<br>*Ku. Snehal Rameshwar Khandare* | 578-583 |
| 20. जागतिकीकरण आणि कृषी क्षेत्रातील बदल<br>*प्रा. नंदकिशोर प्रेमचंद सिंगाडे* | 584-589 |
| 21. ध्वनी प्रदुषणाचे पर्यावरणावर संगीतावर होणारे परिणाम व उपाययोजना<br>*डॉ. वैशाली सदाशिवराव चौरपगार* | 590-592 |
| 22. मराठी साहित्य आणि जागतिकीकरण<br>*प्रा. ए. बी. भावसार* | 593-599 |
| 23. मराठी कादंबरी स्वरूप आणि वैशिष्ट्ये<br>*डॉ. दीपाली प्र. गांवडे* | 600-605 |


Scanned with OKEN Scanner

Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,
Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL SPECIAL ISSUE APR-MAY, 2021, VOL- 8/65

# जागतिकीकरण आणि कृषी क्षेत्रातील बदल

**प्रा. नंदकिशोर प्रेमचंद सिंगाडे**

*सहाय्यक प्राध्यापक, डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी ता. पवनी जि. भंडारा*

*Email:nandkishorsingade3@gmail.com मोब. नं. 9422956365*

**Abstract**

*भारतीय शेतीवर जागतिकीकरणाच्या परिणामा संदर्भात विचार करता असंख्य बदल झाल्याचे दिसून येतात. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार साधारणपणे 25% वाढला. जगातील अविकसित देशांमध्ये साधारणपणे 20 % लोक राहतात. जागतिकीकरणामुळे झालेल्या व्यापार वाढीतून मिळालेल्या लाभाचे वितरण समन्यायी पद्धतीने झाले नाही. 25% वाढलेल्या व्यापारातील नफ्यामध्ये अविकसित देशांचा वाटा 0.3 % आहे तर 20 % विकसित देशांचा वाटा या नफ्यामध्ये 86% आहे. यावरून जागतिकीकरणाच्या बाबतीत भारतीय अर्थव्यवस्थेतील परिणामाचे चित्र स्पष्ट होते. दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणामुळे आपल्या शेती विकासाच्या असंख्य शक्यता निर्माण झाल्या कारण आपण पडीक जमिनी वहिवाटी खाली आणू शकतो. उपलब्ध पाण्याच्या पर्याप्त वापर भूगर्भातील जलसाठयाचे पुनर्भरण होण्यासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन तसेच पावसाच्या पाण्याचे संचयन करण्याच्या पद्धतीचा अवलंब करू शकतो, त्यासाठी जैन तंत्रज्ञानाची मदत होईल.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

जगातील एकूण शेतकऱ्यांपैकी 24 % शेतकरी भारतात आहेत. भारताची अर्थव्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून असल्यामुळे सर्वप्रथम अर्थव्यवस्था मजबूत करणे हे राष्ट्राचे प्रथम कर्तव्य मानले जाते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया कृषीवर आधारित असून मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण व पाणी या प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहेत. भारतीय कृषी क्षेत्रास अर्थव्यवस्थेचा कणा किंवा उद्योगक्षेत्राची जननी आणि मानवी जीवनाचा पोषण कर्ता म्हणून ओळखले जाते कारण रोजगार, अन्नधान्य उत्पादन, आर्थिक विकासात औद्योगिक विकास, निर्यात, व्यापार, राष्ट्रीय उत्पन्न व आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादी क्षेत्रात कृषी बाबतचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेती व्यवसाय अतिशय महत्त्वाचा घटक आहे असे असले तरी कृषी क्षेत्रास अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. वाढणारी लोकसंख्या आणि पिकाऊ जमिनीचा औद्योगिक व शहरीकरण्यासाठी वाढता वापर हे अन्नसुरक्षेसाठी मोठे अडथळे आहेत. आजच्या काळात सुद्धा शेती हा भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. जवळपास 64 % लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून 17 % वाटा कृषी क्षेत्राचा आहे. भारतातील लोकसंख्येला मोठ्या प्रमाणात रोजगार पुरविणारे क्षेत्र असून सुद्धा राष्ट्रीय उत्पन्न आणि निर्यातीतील वाटा व विकासात कोण कोणते अडथळे आहेत हे पाहणे आवश्यक आहे. भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या, नवीन आर्थिक धोरणाचा कृषी क्षेत्रावर झालेला परिणाम, जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्रापुढील समस्या,व ह्या समस्या दूर करण्यासाठी सरकारचे विविध प्रयत्न यांचा अभ्यास करणे हितावह ठरते.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

Scanned with OKEN Scanner